महाज्योती
महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती, नागपूर/ आस्था/ /2022-23, दिनांक :-

## परिपत्रक

विषय :- UPSC 2022-23 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश चाचणीचा निकाल व तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांची सुधारित यादी प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत UPSC 2022-23 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रशिक्षण प्रवेशासाठी दि.12/07/2022 रोजी छाननी परीक्षा घेण्यात आली होती.

दि.03/08/2022 रोजी सर्व उमेदवारांच्या नोंदणी क्रमांकवार तसेच प्राप्त गुणवार निकालाच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदर प्राप्त गुण, मुळ जाहिरात व योजनेच्या तपशीलात नमुद पात्रतेचे निकष, सामाजिक प्रवर्गनिहाय मंजुर उमेदवारांची संख्या या आधारावर प्रशिक्षणार्थींच्या प्रवर्गनिहाय (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग) तात्पुरत्या निवड याद्या (Provisional Selection List) या सोबत दि.11/08/2022 रोजी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

याद्यीच्यानुषंगाने प्राप्त आक्षेप व निवेदने यांच्या विचार करुन महिला व अपंगांसाठी राखीव जागांसह सुधारित तात्पुरत्या निवड याद्या (Revise Provisional Selection List) प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदरच्या याद्या नोंदणीकृत उमेदवारांनी सादर केलेल्या वैयक्तिक माहिती व प्राप्त आवश्यक माहितीच्या आधारावर तयार करण्यात आल्या आहेत. असे असले तरी तात्पुरत्या निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी त्यांचेकडील पुढील मुळ प्रमाणपत्रे, दस्तएवेज तपासणीसाठी व अंतीम निवड करण्यासाठी तयार ठेवावे. सदर तपासणीचे स्थळ व दिनांक यथावकाश कळविण्यात येतील.

1. जातीचे प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र
2. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
3. अधिवासी (Domicile) प्रमाणपत्र
4. आधारकार्ड
5. वर्ग 10 वी ची गुणपत्रिका
6. वर्ग 12 वी ची गुणपत्रिका
7. पदवी प्रमाणपत्र / गुणपत्रिका

कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी 'या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

UD:\Office Work file -A\Latter..docx374

Scanned with CamScanner